खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### ज्ञानदीप प्रकाशन समारंभ : हस्ते - आमदार मा. अमोल मिटकरी

लोकमत



ज्ञानदीपचे प्रकाशन करताना आमदार अमोल मिटकरी, अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील.

## राजगुरू महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर:** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या "पत्रास कारण की..." या संकल्पनेवर आधारित असलेल्या ज्ञानदीप वार्षिकांकाचे प्रकाशन आमदार अमोल मिटकरी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, लक्ष्मण टोपे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या वार्षिकांकात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या सुमारे ५२ पत्रांसह, उपक्रमांचे फोटो, विविध समिती व विभागांच्या अहवालाचा समावेश करण्यात आलेला आहे.

यांप्रसंगी बोलताना अमोल मिटकरी म्हणाले की, मानवी मनातील नैसर्गिक भावभावनांची अभिव्यक्ती ही पत्रांच्या माध्यमातून होत असते. दोन व्यक्तींचे पत्राच्या माध्यमातून भावबंध स्थापित होत असतात. पत्रलेखन नव्या पिढीला सावरण्यासाठी आणि ठामपणे उभे करण्यासाठी काळाची गरज असल्याने संपादक मंडळाने पत्रास कारण की ही संकल्पना घेतल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करून या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, संवाद ही आपली संस्कृती असून पत्र ही जगण्याला बळ देतात. सध्याच्या यंत्रोत्सवी जगण्यात पत्र जवळीक साधण्याचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने आविष्कृत होण्यासाठी पत्रलेखनाचे माध्यम जाणीवपूर्वक वापरावे असे त्यांनी सांगितले. वार्षिकांकाचे संपादन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Feb 03, 2023
Powered by: erelego.com

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**